<u>पदभरती जाहिरात</u>

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी

## <u>कंत्राटी तत्वावर एमबीबीएस / बी.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी पद भरती</u>

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी मध्ये जिल्हा परिषद अंतर्गत प्रा.आ.केंद्रमध्ये एम.बी.बी.एस./ बी. ए. एम. एस. वैद्यकिय अधिकाऱ्यांची निव्वळ कंत्राटी स्वरुपात 11 महिने कालावधी करीता करार तत्त्वावर थेट पद भरती करण्यात येणार आहे.

जाहिरातीतील घोषित पदे :- ०७

| अ. क्र. | तालुका | प्रा.आ.केंद्र | पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | दापोली | दाभोळ | १ |
| 2 | चिपळूण | रामपूर | १ |
| 3 | चिपळूण | खरवते | १ |
| 4 | खेड | कोरेगांव | १ |
| 5 | खेड | वावे | १ |
| 6 | राजापूर | फुफेरे | १ |
| 7 | राजापूर | ओणी | १ |

शैक्षणिक अर्हता :-

उमेदवार एम.बी.बी.एस./ बी. ए. एम. एस. पदवी धारक असावा.

## <u>अटी व शर्ती</u>

१. तात्पुरती नियुक्ती दिलेल्या एमबीबीएस वैदयकिय अधिकाऱ्यांना ७५०००/- (रु.पंचाहत्तर हजार मात्र) व बीएएमएस वैदयकिय अधिकाऱ्यांना मासिक रु.४०,०००/-(रु.चाळीस हजार मात्र) इतके एकत्रित मानधन अदा करण्यात येईल.

२. सदर वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस अर्हताधारक नियमित वैदयकिय अधिकारी ,बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी रुजू झाल्यास कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांस रत्नागिरी जिल्ह्यातील अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात येईल किंवा कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर तदर्थ वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैदयकिय अधिकाऱ्यांसारखे (म)से.ना.निवृत्तीवेतन, (म)से.ना.रजा नियम लागू राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवाविषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

४. तदर्थ वैदयकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

Scanned with CamScanner

५. सदर तदर्थ नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही. त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

६. केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

७. केवळ तात्पुरती व तदर्थ नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची (निवृत्ती वेतन) से.ना.ती सेवा म.नियम १९८२ नुसार अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा ३० नियम सेवाजेष्ठता वा अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवा बाबींसाठी ग्राळय धरली जाणार नाही.

८. सदर तदर्थ वैदयकिय अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतूदी लागू होतील.

९. तदर्थ वैदयकिय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१०. सदरची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने या पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगता येणार नाही व त्यासाठी तसेच इतर मागण्यांसाठी आंदोलन/बंद/संप इ. करणार नाही किंवा त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर रुजू होताना सादर करावे लागेल.

११. आपण दिलेल्या पदावर नियुक्ती स्विकारुन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर वरील सर्व अटी शर्ती आपणास मान्य आहेत असे गृहित धरण्यात येईल.

**उमेदवारांने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. उमेदवाराचा विनंती अर्ज.
२. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे / गुणपत्रके जोडणे आवश्यक आहे.
३. अर्जात अनुभव नमूद केल्यास त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांचे अनुभवाचे प्रमाण जोडणे आवश्यक .
४. उमेदवारांने मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी केलेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास, त्या पृष्ठयर्थ शासन राजपत्राची प्रत जोडणे आवश्यक.

Scanned with CamScanner